महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १६७ वे | दिनांक : १२/०६/२०२६ | वार : शुक्रवार

## राज्यसभा निवडणूक: २६ पैकी १४ जागा बिनविरोध : भाजपचे १०, काँग्रेसचे ४ विजयी



**नवी दिल्ली :** १४ उमेदवारांनी गुरुवारी राज्यसभेची निवडणूक बिनविरोध जिंकली. त्यांच्या विरोधात इतर कोणताही उमेदवार उभा नव्हता. यामध्ये १० भाजपचे आणि ४ काँग्रेसचे आहेत. निवडणूक जिंकणाऱ्यांमध्ये कर्नाटकातून काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि माध्यम व प्रचार प्रमुख पवन खेडा यांच्या नावांचा समावेश आहे.

तर, राजस्थानमधून भाजपचे सतीश पुनिया, अलका गुर्जर आणि काँग्रेसचे नीरज डांगी राज्यसभेसाठी बिनविरोध निवडून आले आहेत. याशिवाय, गुजरातमधून भाजपच्या सर्व चार राज्यसभा उमेदवारांना बिनविरोध निवडून आल्याचे घोषित करण्यात आले आहे.

तर, मध्य प्रदेशमधून भाजपचे रजनीश अग्रवाल, तरुण चुघ आणि महेश केवट विजयी झाले आहेत. मात्र, यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने काँग्रेस उमेदवार मीनाक्षी नटराजन यांचे नामांकन रद्द करण्याविरोधात पक्षाने दाखल केलेल्या याचिकेवरील सुनावणी शुक्रवारपर्यंत पुढे ढकलली होती.

खरं तर, तिसऱ्या जागेसाठी काँग्रेसने मीनाक्षी नटराजन यांना उमेदवार बनवले होते. काँग्रेसकडे संख्याबळही होते, परंतु ९ जून रोजी नटराजन यांचा उमेदवारी अर्ज रद्द करण्यात आला होता.

आंध्र प्रदेशच्या ४, झारखंडच्या २ आणि मणिपूर, मेघालय, अरुणाचल, मिझोराम, महाराष्ट्र, आणि तामिळनाडूच्या प्रत्येकी एका जागेवर १८ जून रोजी मतदान होईल. येथे काँग्रेसला एक, भाजपला ८, जेएमएमला दोन आणि टीव्हीकेला एका जागेवर विजय मिळू शकतो.

२४५ सदस्य असलेल्या राज्यसभेत एनडीएकडे सध्या १४७ खासदार आहेत, तर विरोधकांकडे ६७ आणि बिगर-युती प्रादेशिक पक्षांकडे २८ खासदार आहेत.

महाराष्ट्रामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुनेत्रा पवार आणि तामिळनाडूमध्ये AIADMK च्या सी.व्ही. षण्मुगम यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या जागांवर पोटनिवडणुका होतील. महाराष्ट्रातील जागा NDA च्या खात्यात येऊ शकते. तर तामिळनाडूतील AIADMK ची जागा सत्ताधारी पक्ष TVK ला मिळू शकते. TVK ला काँग्रेसचा पाठिंबा आहे.

आंध्र प्रदेशमध्ये तीन जागा YSRCP कडे आहेत, एक TDP कडे आहे. आता NDA चारही जागा जिंकू शकते.

गुजरातमध्ये तीन भाजप आणि एक काँग्रेसकडे आहे. निवडणुकीत भाजपने चारही जागा जिंकल्या आहेत.

झारखंडमध्ये दोन जागा आहेत. एक जागा भाजपच्या ताब्यात आहे. एक रिक्त आहे. दोन्ही जागा JMM-काँग्रेस आघाडीला मिळू शकतात. पण भाजपजवळ २१ आमदार आहेत. जर चार विरोधी सदस्यांनी क्रॉस-व्होटिंग केले तर ते एक जागा जिंकू शकतात.

मध्य प्रदेशमध्ये तीन जागा आहेत. भाजपने सर्व जागा जिंकल्या आहेत.


राजस्थानमध्येही तीन जागा आहेत. त्यापैकी दोन भाजप आणि एक काँग्रेसकडे आहे. येथे कोणताही बदल होणार नाही.

कर्नाटकात सध्या NDA कडे तीन, काँग्रेसकडे एक जागा आहे. निवडणुकीत काँग्रेसने तीन जागा जिंकल्या आहेत. तर NDA ला एक जागा मिळाली आहे.

मणिपूर आणि अरुणाचल प्रदेशात प्रत्येकी एक जागा रिक्त होत आहे. दोन्ही जागा भाजपच्या ताब्यात आहेत, पक्ष पुन्हा त्या मिळवू शकतो. मिझोरममध्ये सध्या मिझो नॅशनल फ्रंटकडे एक जागा आहे, जी जोरम पीपल्स मूव्हमेंट जिंकू शकते. मेघालयमध्ये नॅशनल पीपल्स पार्टी आपली जागा वाचवण्यात यशस्वी होऊ शकते. ही एनडीएच्या आघाडीत आहे.

## धनंजय मुंडेंनी व्यक्त केली पक्षाच्या वर्धापन दिनी मंत्रिपदाची इच्छा





**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २७ वर्धापन दिन सोहळा आज मुंबई साजरा करण्यात आला. अजित पवारांशिवाय होणारा हा पहिला वर्धापन दिन कार्यक्रम होता. या कार्यक्रमात पक्षाचे आमदार धनंजय मुंडे यांनी क्रिकेटचे रूपक वापरत पक्षश्रेष्ठींसमोर थेट मंत्रिपदाची सुप्त इच्छा व्यक्त केली आहे. "स्टेजवर बसलेल्यांना संधी मिळाली आहे, पण समोर बसलेले कार्यकर्ते विचारतायत की आम्ही नेहमी १२ वे खेळाडूच राहणार का? आम्हाला कधी संधी मिळणार?" असा सवाल उपस्थित करत मुंडे यांनी अप्रत्यक्षपणे आपली राजकीय महत्त्वाकांक्षा बोलून दाखवली. त्यांच्या या राजकीय गुगलीवर राष्ट्रवादीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांनी तितक्याच ताकदीने प्रत्युत्तर देत "तुमचा इशारा आम्हाला समजला आहे, काळजी करू नका," असे सूचक आश्वासन दिले आहे. कार्यक्रमात बोलताना धनंजय मुंडे यांनी समोर बसलेल्या कार्यकर्त्यांची भावना मांडताना तुफान फटकेबाजीकेली. ते म्हणाले, ""मघासपासून इथे खेळाचा विषय सुरू आहे. आज मी समोर बसलेल्या जनतेची आणि कार्यकर्त्यांची भावना मांडणार आहे. स्टेजवर बसलेल्या नेत्यांना संधी मिळाली आहे, पण समोरचे विचारतायत की आम्ही क्रिकेटच्या संघात फक्त १२ व्या स्थानावरच (राखीव खेळाडू) राहणार का? आम्हाला कधी मुख्य अजितदादांनी रस्त्यावरच्या खड्याला घडवलं यावेळी धनंजय मुंडे यांनी अजित पवार यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. "अजितदादांनी माझ्यासारख्या रस्त्यावरच्या खड्याला पैलू पाडून घडवले. तीच दूरदृष्टी आणि विचार आता मला सुनेत्रा वहिनी यांच्यामध्ये पाहायला मिळत आहे," असे म्हणत त्यांनी पवार कुटुंबीयांच्या नेतृत्वावर विश्वास दर्शवला. तसेच, राज्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला 'नंबर वन' करण्यासाठी सर्वांनी संघर्ष आणि नवा संकल्प करावा, असे आवाहनही त्यांनी कार्यकर्त्यांना केले.

प्रफुल पटेलांचे मुंडेंना सूचक आश्वासन

धनंजय मुंडे यांनी दिलेल्या या इशाऱ्यानंतर मंचावर उपस्थित ज्येष्ठ नेते प्रफुल पटेल यांनी मुंडेंच्या मनातील इच्छा ओळखून त्यांना जाहीर आश्वस्त केले. प्रफुल पटेल मुंडेंना उत्तर देताना म्हणाले, "शेवटचा कार्यकर्ता कुणीही 'नॉट आउट' राहिला पाहिजे, हा धनंजय मुंडेंनी दिलेला इशारा आम्हाला पूर्णपणे समजलेला आहे. त्यामुळे तुम्ही त्याची अजिबात चिंता करू नका. राजकारणात रिटायर्ड हर्ट होणाऱ्यालाही परत बॅटिंग करण्याची परवानगी मिळत असते. त्यांची गणना बाद झालेल्या खेळाडूंमध्ये होत नाही. त्याम्ळे तुम्ही काळजी करू नका; आपण हर्ट होणाऱ्यालाही परत बॅटिंग करण्याची परवानगी मिळत असते. त्यांची गणना बाद झालेल्या खेळाडूंमध्ये होत नाही. त्यामुळे तुम्ही काळजी करू नका; आपण सर्वांनी जास्तीत जास्त काम करून पक्ष वाढवावा."

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १२ जून २०२६


## शिवराज्याभिषेक सोहळयात सह्याद्री दुर्गसेवकांची दुर्गस्वच्छता मोहिम



**कन्नड (अरुण थोरात) :** स्वराज्य राजधानी रायगड येथे अखंड हिंदुस्थानाचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिनानिमित्त सह्याद्री प्रतिष्ठान संभाजीनगर विभागाच्या वतीने दुर्गस्वच्छता मोहिम राबविण्यात आली.या निमित्त सह्याद्री प्रतिष्ठान हिंदूस्थान बारा मावळ विभाग यांच्या सोबत सह्याद्री प्रतिष्ठान हिंदूस्थान छत्रपती संभाजीनगर विभागातील दुर्ग सेवकांनी दुर्ग स्वच्छता मोहिम राबविली दि.06 जून रोजी राज्याभिषेक सोहळ दुर्गराज रायगड येथे संपन्न झाला. रायगडावर लाखो तरूणाई चा सागर उसळला होता. त्यामुळे फेकलेल्या वस्तूंचा मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण झाला. दुसऱ्या दिवशी पुणे रायगड विभागातील बारा मावळ विभागातील सह्याद्री प्रतिष्ठान हिंदूस्थान यांच्या सोबत सह्याद्री प्रतिष्ठान हिंदूस्थान छत्रपती संभाजीनगर विभागातील दुर्ग सेवक आकाश बारगळ, अविनाश बारगळ, स्वप्नील बोरकरपंकज मडकर, करन मते आदी सह दुर्गसेवकानी रायगड स्वच्छता मोहीम राबवित कचर्याची सुरक्षित ठिकाणी विल्हेवाट लावत एक आदर्श निर्माण केला.

## ज्ञानदा कौशल्य संस्थेचा विद्यार्थी सैनिक राज बारगळ यांचा सत्कार



**कन्नड (अरुण थोरात) :** ज्ञानदा कौशल्य विकास संस्था (आयटीआय कॉलेज) कन्नड चा माजी विद्यार्थी राज विजय बारगळ याची भारतीय सैन्य दलात इलेक्ट्रिशियन विभागात निवड झाल्याबद्दल त्याचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला आहे.विशेष म्हणजे इलेक्ट्रिशियन हा कोर्स केल्यामुळे राजला ३० गुणांचा राज ला सैन्य भरती मध्ये लाभ मिळाला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष विलास इंगळे, संस्थेच्या प्राचार्या अमृता विलास इंगळे, वडिल विजय बारगळ, ज्ञानेश्वर बारगळ, माजी मुख्याध्यापक श्री शेख, संस्थेचे कर्मचारी सचिन पिंपळे, आशिष मोरे, राहुल गायकवाड, सुरेंद्र राहणे, संगीता देशमुख, दांडगे ताई, आदी उपस्थित होते. "जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर राजने मिळवलेले हे यश सर्व कन्नडकरां साठी अत्यंत अभिमानास्पद आहे." तांत्रिक शिक्षण हे केवळ औद्योगिक क्षेत्रातील नोकऱ्यां साठीच उपयोगी नसून या द्वारे तरुणांना सैन्य, रेल्वे आदी सरकारी विभागांत ही चांगल्या संधी उपलब्ध होतात. त्यामुळे महागड्या शिक्षणाला पर्याय व अल्पकाळाचे तंत्रशिक्षण म्हणून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन नोकरी व स्वयंरोजगार संधी मिळवाव्यात असे अवाहन संस्थेचे अध्यक्ष विलास इंगळे यांनी केले.

## लंगडातांडा येथील स्व.विलास राठोड यांच्या परिवारास पाच लाखांची मदत



**कन्नड (अरुण थोरात) :** तुळजाभवानी ऊसतोड कामगार संघटना यांच्या प्रयत्नाने व संघटनेचे अध्यक्ष सुरेश पवार धाराशिवकर, संघटनेचे संभाजीनगर जिल्हाअध्यक्ष राजू पवार यांच्या प्रयत्नाने कन्नड, मनसेचे विधानसभा अध्यक्ष लखन चव्हाण यांच्या पाठपुराव्याने लंगडातांडा ता.कन्नड येथील स्व.विलास बुधा राठोड यांच्या परिवारास गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळ च्या वतीने ही पाच लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे. दोन वर्षापूर्वी स्व.विलास हे बैल चारीत असताना पाय घसरून तलावात पडून त्यांचा मृत्यु झाला होता. या घटनेने तालुका हळहळ करत होता स्व.विलास राठोड यांना दोन मुली दोन मुले असा परिवार आहे. या दोन मुलींचे आणि दोन मुले असा परिवार होता. तसेच ते कुटूंबातिल एकमेव कमावते व्यक्ती असल्याने वृद्ध आई वडीलांची अत्यंत हलाकीची परिस्थिती होती. अनेक लोकप्रतिनिधींनी केवळ हजेरी लाऊन जात होते. परंतु मदत करायला कुणीही तयार नव्हते. यात तुळजाभावी संघटनेचे अध्यक्ष सुरेश पवार यांची मदत मिळाली व कागदपत्रे साठी लंगडातांडा येथील शिवाजी राठोड यांची मोलाची मदत मिळाली या मदतीचा धनादेश गावातील प्रतिष्ठित नागरिक श्री. चव्हाण व राजू पवार यांच्या उपस्थित शिवाजी राठोड, खुशाल राठोड, शंकर राठोड, पंडित राठोड, जयलाल चव्हाण, नामदेव चव्हाण यांच्या उपस्थितीत स्व.विलास बुधा राठोड कुटूंबियांना प्रदान करण्यात आल्याची माहिती लखन चव्हाण यांनी दिली.

## चौथीच्या अभ्यासक्रमात बँन्डमास्टर अय्युब पठाण यांच्या " कौतुकाची थाप " कथेचा समावेश

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार बालभारतीच्या अभ्यासक्रमाची निर्मिती जून २०२६ पासून करण्यात आलेली आहे.यामध्ये संपूर्ण महाराष्ट्र राज्यातल्या शाळेमध्ये इयत्ता चौथीच्या मराठी माध्यमातील पाठयपुस्तकात छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील लोहगाव ता. पैठण येथील प्रसिध्द व लोकप्रिय साहित्यिक श्री. अय्युब पठाण लोहगावकर यांच्या " कष्टाच्या वाटा " या बालकथा संग्रहातील प्रेरणादायी आणि संस्कारक्षम, शैक्षणिक मूल्यांवर आधारीत " कौतुकाची थाप " या कथेचा येत्या जून पासून चौथीच्या अभ्यासक्रमात समावेश बालभारतीने केला आहे. नवीन वर्षात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार यावर्षी चौथीच्या पाठयपुस्तकाची बालभारतीच्या नेमलेल्या तज्ञ समितीकडून निर्मिती केलेली असून विद्यार्थी यांच्या अध्ययन निष्पतीवर आधारीत कौशल्याधिष्ठित शिक्षणावर अधिक भर देण्यात आलेला आहे. मराठवाडयातील प्रसिध्द साहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर यांच्या विविध साहित्य निर्मितीची महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने योग्य दखल घेऊन श्री.अय्युब पठाण यांच्या " कौतुकाची थाप " या कथेचा समावेश इयत्ता चौथीच्या पाठयपुस्तकात करण्यात आलेला आहे. येत्या जून पासून हा अभ्यासक्रम लागू करण्यात येणार असून अय्युब पठाण लोहगावकर यांचा शैक्षणिक व साहित्यक्षेत्राकडून अभिनंदन होत आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १२ जून २०२६


## अंजना स्कुल ऑफ एक्सलेंस च्या विद्यार्थ्यांचे सी. व्ही रमण बाल वैज्ञानिक परिक्षेत घवघवीत यश

**दौलताबाद (जावेद अहमद) :** ग्रामीण भागात असलेल्या आसेगाव ता गंगापूर जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथील अंजना स्कुल ऑफ एक्सलेंस च्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवत शाळेचे नावलौकीक वाढवले आहे. चालू वर्षीच्या सी. व्ही रमण बाल वैज्ञानिक परिक्षेत शाळेतील ५ वी ते ९ वी च्या ४४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता या १००% यश मिळवले ,या मधे वैज्ञानिक दृष्टिकोन, निरीक्षण क्षमता , आणि प्रयोगाधारित ज्ञान तपासणार्या या परिक्षेत यश मिळवले या मधे सी प्राईज श्रेणीत तसेच जिल्हा स्तरावर अनेक विद्यार्थी निवडले गेले आहेत या विद्यार्थ्यांना सतीश धवन स्पेस सायन्स सेंटर श्रीहरिकोटा ( एस.डी.एस सी इस्त्रो ) तसेच चेन्नई येथील सायन्स सेंटर प्लॅनेटोरियम म्युझियम पाहण्यासाठी इस्त्रो तर्फे निमंत्रण देण्यात आले आहे . या यशा बदल अंजना स्कुल ऑफ एक्सलेंस संचालीका मोनिका पल्हाळ, प्राचार्य डॉ स्नेहा पवार , व्यवस्थापक देव साठे सर्व शिक्षक वृंद यानी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या ..

## शशिकांत पंचगल्ले यांना अर्थशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी



**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** प्राध्यापक शशिकांत पंचगल्ले यांना अर्थशास्त्र विषयात स्वामी रामानंद तिर्थ विद्यापीठाची पीएच.डी.पदवी जाहीर दिनांक १० जुन २०२६ रोजी झालेल्या मौखिक परिक्षेनंतरदिग्रस बु. तालुका कंधार चे भूमिपुत्र तथा शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील अर्थशास्त्र विभागात कार्यरत सहाय्यक प्राध्यापक शशिकांत पंडितराव पंचगल्ले यांनी मानव्य विद्या शाखेंतर्गत अर्थशास्त्र विषयात सार्वजनिक वित्त या विषयातील "Evaluation of Provisions of Club Goods and Merit Goods provided by Local Govt.: Case Study of Nanded Waghala Municipal Corporation" या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर पीएच. डी. शोध प्रबंध स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाला सादर केला होता. मौखिक परीक्षेनंतर त्यांना प्रस्तुत विद्यापीठाने पीएच.डी. पदवी जाहीर केली. यावेळी चेअरमन म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील अर्थशास्त्राची प्राध्यापक तथा सामाजिक शास्त्रे संकुलाचे डायरेक्टर डॉक्टर लोणारकर उपस्थित होते. संशोधन मार्गदर्शक डॉ. प्राचार्य विभुते सर सह मार्गदर्शक डॉ. पाते सर, बहिस्थ परीक्षक उस्मानिया विद्यापीठ हैदराबाद येथील प्रा. एम रामलू, प्रा.राम बिन्हाडे, प्रा.शालिनी कदम, प्रा. बाबुराव जाधव, प्रा. बोधगिरे, प्रा. चंदन बोरा, प्रा. बाजीराव वडवळे, प्रा. विशाल बेलुरे, महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी श्री शंकर महाजन, प्रा. डी.डी. भोसले, प्रा.ज्ञानेश्वर पोपुलवाड यांच्या सह सामाजिक शास्त्रीय संकुलातील संशोधक विद्यार्थी उपस्थित होते. या पीएच.डी. पदवी मिळवण्यात त्यांच्या पत्नी सौ. मिनल पंचगल्ले यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. तसेच त्यांचे वडील गणित विषयाचे गाडे अभ्यासक पंडीत पंचगल्ले व त्यांच्या मातोश्री गोपिका पंचगल्ले,मोठे बंधु सध्या खोपोली येथील महाविद्यालयात कार्यरत डॉ. शरद पंचगल्ले यांचेही मोलाचे सहकार्य लाभलेडॉ.शशिकांत पचगल्ले यांनी पीएच.डी पदवी मिळवल्याबद्धल परिवारातील जेष्ठ वैजनाथराव पंचगल्ले,गंगाधर पंचगल्ले,शिवराज पंचगल्ले,गुरुबस पंचगल्ले,बाबुराव पंचगल्ले,लातुर येथे कर्यरत असलेले सहाय्यक सहसंचालक संजय पंचगल्ले,सोमनाथ निरणे,मन्मथ निरणे,सौ.संगीता निरणे,लता निरणे व संपुर्ण समाज बांधवा कडुन अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## लातूर-बीड-धाराशिव विधान परिषद निवडणूक: बसवराज पाटील यांच्या प्रचारार्थ भव्य संवाद बैठक




**लातूर/उमरगा (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** उस्मानाबाद-बीड-लातूर (लातूर—बीड—धाराशिव) स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीच्या निमित्ताने भाजप-महायुतीचे अधिकृत उमेदवार बसवराज पाटील यांच्या प्रचारार्थ लातूर येथे मतदार आणि कार्यकर्त्यांची भव्य संवाद बैठक नुकतीच प्रचंड उत्साहात संपन्न झाली. या बैठकीला भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. या महत्त्वपूर्ण निवडणूक दौऱ्याची सुरुवात अत्यंत मांगल्यमय वातावरणात सकाळी ९:०० वाजता लातूरचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर-रत्नेश्वर मंदिरात दर्शनाने आणि विशेष रुद्राभिषेकाने झाली. त्यानंतर सकाळी ११:०० वाजता स्थानिक 'हॉटेल ग्रँड सरोवर' येथे तिन्ही जिल्ह्यांतील मतदारांची एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली, ज्यामध्ये प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी उपस्थित मतदारांशी आणि पदाधिकाऱ्यांशी थेट संवाद साधून निवडणुकीच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. या प्रसंगी बोलताना प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी, बसवराज पाटील यांच्या विजयासाठी महायुतीच्या सर्वच लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकजुटीने मेहनत करावी, असे आवाहन करत मतदान केंद्रावर मतदान यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सज्ज होण्याचे आदेश दिले.या मेळाव्यात मतदारांना संबोधित करताना महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांनी, पक्षाने माझ्या आजवरच्या कार्याची दखल घेऊन मला ही उमेदवारी दिली आहे, या विश्वासाला पूर्णपणे सार्थ ठरवून आगामी काळात अत्यंत लोकाभिमुख आणि समाजाभीमुख स्थानिक स्वराज्य संस्था घडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करेन, अशी ग्वाही दिली आणि मतदारांना आपल्याला विजयी करण्याचे आवाहन केले. तर दुसरीकडे, माजी मंत्री तथा आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी आपल्या भाषणात अत्यंत ठाम निर्धार व्यक्त करत, बसवराज पाटील यांना भरघोस मतांनी निवडून आणून जिल्ह्यात महायुतीचा ६ वा आमदार विजयी करण्याचा संकल्प जाहीर केला; तसेच हा निर्धार पूर्ण करण्यासाठी तिन्ही जिल्ह्यांतील सर्व कार्यकर्त्यांनी आपली संपूर्ण ताकद पणाला लावावी, असे आवाहनही त्यांनी केले.या भव्य बैठकीला महायुतीच्या अनेक ज्येष्ठ आणि दिग्गज नेत्यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. यामध्ये माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार अशोकराव चव्हाण, निवडणूक निरीक्षक सुनील राणे, माजी मंत्री तथा आमदार संभाजी पाटील निलंगेकर, माजी मंत्री व आमदार राणाजगजितसिंग पाटील, आमदार सुरेश धस, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड, धाराशिव जिल्हा परिषद अध्यक्षा सौ. अर्चना पाटील,लातूर जिल्हा परिषद अध्यक्षा सौ. उषा पाटील तळेगावकर, माजी खासदार सुनील गायकवाड, माजी खासदार सुधाकर शृंगारे, शिरूर कासार नगरपरिषद अध्यक्षा सौ. प्रतिभाताई गाडेकर,माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, माजी आमदार दिनकरराव माने, माजी आमदार बदामराव पंडित, माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे, माजी आमदार गोविंदआण्णा केंद्रे, प्रदेश उपाध्यक्षा डॉ. सौ. अर्चना पाटील चाकूरकर, माजी प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर, योगेश क्षीरसागर, प्रदेश प्रवक्ते गणेश हाके, धाराशिवचे जिल्हाध्यक्ष दत्तात्रय कुलकर्णी, बीडचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, अक्षय मुंदडा, मुरूमचे नगराध्यक्ष तथा धाराशिव जिल्हा बँक चेअरमन बापूराव पाटील, उमरगा जनता बँक चेअरमन शरण पाटील, प्रदेश प्रवक्त्या प्रेरणा होनराव यांचा समावेश होता. याशिवाय धाराशिव जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. अस्मिताताई कांबळे, लातूरचे माजी जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख आणि धाराशिवचे माजी जिल्हाध्यक्ष ॲड. नितीन काळे, प्रदेश प्रवक्ते प्रेरणाताई होनराव यांच्यासह उस्मानाबाद, बीड आणि लातूर या तिन्ही जिल्ह्यातील भाजपाचे नगराध्यक्ष, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती आणि नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या संपूर्ण बैठकीचे अत्यंत नेटके सूत्रसंचालन जिल्हा परिषद गटनेते रामचंद्र तिरुके यांनी केले, तर उपस्थितांचे आभार शहर जिल्हाध्यक्ष डॉ. अजित पाटील कव्हेकर यांनी मानले. महायुतीच्या या भव्य शक्तिप्रदर्शनामुळे निवडणूक क्षेत्रात कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह निर्माण झाला आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002



# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १२ जून २०२६

## हत्तीदादा

हत्तीदादा तुमचे
शरीर किती मोठे
शरीराच्या मानाने
डोळे मात्र छोटे

पाय तुमचे दिसतात
जणू मंडपाचे खांब
झाडपाला खाण्यासाठी
सोंड लांबच लांब

हत्तीदादा तुमचे
सुपासारखे कान
शेपूट थोडी वाकडी
आखूड थोडी मान

का बरं तुमचे
अंग सारे काळे?
शोभून दिसतात
पांढरे शुभ्र सुळे

वाघ, सिंह, कोल्हा
यांनाही करता गार
पण चिमुकल्या मुंगीसमोर
मानता तुम्ही हार



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**

## येरे येरे मेघराजा

नभी भरून येतात,
आता काळे काळे ढग.
नाही पडत पाऊस,
कसे विझणार धग. १

ढग भरून येताच,
वारे वाहून नेतात.
आता कोरडे कोरडे,
उष्ण वारेच येतात. २

मृग नक्षत्रात असे,
कधी घडत नसते.
माय माझी रानामध्ये,
वाट पाहत बसते. ३

ओटी बांधून पोटाला,
माय पेरणीस येते.
येरे येरे मेघ राजा,
शेवटची हाक देते. ४


मृग नक्षत्रात असे,
ढग वाऱ्याने पळाले.
राबणारा शेतकरी,
चिंता करून गळाले. ५

येरे येरे मेघाराजा,
बळी देतो तुला हाक.
करू नको आम्हावरी,
मृगामध्ये डोळे झाक. ६


तूच आहेस आमुचा,
संकटात तारणारा,
असे होऊन निष्ठुर,
होऊ नको मारणारा. ७

***नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर***

# कवी मनोहर आंधळे यांच्या कवितेचा इयत्ता चौथीच्या पाठ्यपुस्तकात समावेश




चाळीसगाव येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक तथा महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा चाळीसगावचे कार्याध्यक्ष कवी-मनोहर ना.आंधळे यांच्या जिंकू आम्ही लढाई या बालकवितेचा महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे,बालभारती तर्फे इयत्ता चौथी (इंग्रजी माध्यम शाळा) या वर्गासाठी शैक्षणिक वर्ष सन २०२६-२७ पासूनच्या नवीन अभ्यासक्रम पाठ्यपुस्तक "शिकू मराठी आनंदाने" मध्ये समावेश करण्यात आला आहे. यापूर्वी हीच कविता जिंकू आम्ही लढाई (KTBS) कर्नाटक टेक्स्ट बूक सोसायटी, बेंगलोर कडून इयत्ता सातवीच्या वर्गासाठी सन २०१९ पासून पुढील दहा वर्षांसाठी निवडली गेली आहे. तसेच सन २०२३ पासून गुजरात राज्य अभ्यासक्रम मंडळाने कवी मनोहर आंधळे यांची अवतरले शिवराय ही "किशोर" मासिक फेब्रुवारी २०२० मध्ये प्रसिद्ध कविता इयत्ता पाचवी च्या मराठी विषय अभ्यासक्रमात घेतली आहे. तर सन २०१५ मध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या TYBA अभ्यासक्रमातील "उपयोजित मराठी" संदर्भ ग्रंथ पुस्तकात सारांश लेखनासाठी कविता समाविष्ट आहे. गेल्या पस्तीस वर्षांपासून कविता लिखाण करणाऱ्या कवी मनोहर आंधळे यांच्या आजतागायत २९ कविता बालभारतीच्या "किशोर" मासिक पुणे मधून प्रसिद्ध झालेल्या आहेत. महाराष्ट्रातील नामवंत दिवाळी अंक व मासिकातून त्यांच्या अनेक कविता प्रसिद्ध झालेल्या आहेत.त्यांचे "सौरभ", "लेकी तुझ्यासाठी" व "डोळ्यात कालचे पाणी" हे काव्यसंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. उपरोक्त चौथीच्या अभ्यासक्रमासाठी "निवडक किशोर" या ग्रंथातून निवडली गेल्याचे पत्र बालभारती कार्यालयातून आंधळे यांना प्राप्त झाले आहे. या उल्लेखनीय यशाप्रित्यर्थ महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे शाखा चाळीसगाव चे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य तानसेन जगताप, मसाप शाखा कार्यकारी विश्वस्त तथा पत्रकार किसनराव जोर्वेकर,मसाप जिल्हा प्रतिनिधी अनुक्रमे गणेश आढाव व प्राचार्य वासुदेव वले(पाचोरा), बालभारती अभ्यासक्रम मंडळ सदस्य सुनील गायकवाड, ज्येष्ठ बंधू प्रा.वा.ना.आंधळे(एरंडोल),म.सा.प.चाळीसगाव शाखेचे पदाधिकारी व सदस्य तसेच सेवा सहकारी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव राजेश राठोड, उपाध्यक्ष मच्छिंद्र राठोड, संचालक योगेश चव्हाण यांचेसह जिल्ह्यातील साहित्यिक व शिक्षक मित्रांनी कवी आंधळेंचे अभिनंदन केले आहे.



**- आंधळेंचे अभिनंदन**

# बीरभूम येथे अप्पर पोलीस अधीक्षकपदी निलेश गायकवाड रुजू



**मुरुम (प्रा.सुधीर पंचगल्ले) :** उमरगा तालुक्यातील जवळगा बेट येथील रहिवासी तथा कर्तव्यदक्ष आयपीएस अधिकारी निलेश श्रीकांत गायकवाड यांची अप्पर पोलीस अधीक्षक (Additional Superintendent of Police) पदावर पदोन्नती होऊन पश्चिम बंगाल राज्यातील बीरभूम जिल्ह्यात नियुक्ती झाली आहे. त्यांच्या याबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.निलेश गायकवाड हे यापूर्वी पश्चिम मेदिनीपुर जिल्ह्यातील घाटाल येथे उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून कार्यरत होते. आपल्या सेवाकाळात त्यांनी कर्तव्यनिष्ठा, शिस्तबद्ध कार्यपद्धती, प्रभावी नेतृत्व आणि जनहिताभिमुख कामकाजाच्या जोरावर उल्लेखनीय कामगिरी केली आहे.पदोन्नतीनंतर त्यांची नियुक्ती पश्चिम बंगालमधील महत्त्वाच्या व संवेदनशील समजल्या जाणाऱ्या बीरभूम जिल्ह्यात करण्यात आली असून ते नुकतेच आपल्या नव्या पदावर रुजू झाले आहेत.बीरभूम जिल्ह्यात बोलपूर, रामपूरहाट आणि सूरी या तीन उपविभागांचा समावेश असून जिल्ह्यात 28 पोलीस ठाणे कार्यरत आहेत. याशिवाय वाहतूक शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, सायबर गुन्हे शाखा, गुप्तवार्ता विभाग तसेच विशेष तपास पथके स्वतंत्रपणे कार्यरत आहेत.अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून निलेश गायकवाड यांच्यावर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या कामकाजाचा समन्वय साधणे, कायदा व सुव्यवस्था राखणे, गुन्हे नियंत्रण, प्रशासकीय देखरेख तसेच विविध विशेष मोहिमांच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा पोलीस अधीक्षकांना सहाय्य करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी असणार आहे.त्यांच्या पदोन्नती व नव्या नियुक्तीबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून त्यांच्या पुढील यशस्वी सेवाकाळासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.




## निधन वार्ता



**दौलताबाद :** आसेगाव तालुका गंगापूर येथिल हाजी रहेमान खान पठाण वय (८५) यांचे दि ११ गुरुवारी सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले त्यांचे दफनविधी आसेगाव कबरस्थान येथे करण्यात आले आहे त्यांच्या पश्चात दोन मुले,चार मुली नातवंडे असा परिवार होतासामाजिक कार्यकर्ते आसिफ पठाण यांचे ते आजोबा होते

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १२ जून २०२६


## रितेश मेंगाळ आणी गीता मधे या दोघांनी अनुसूचित जमाती ठाकर समाजातून मिळवले प्रथम घवघवीत यश





**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** सांगली येथील वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग पदवीदान समारंभ उत्साहात संपन्न झाला. आनंदाची खास बाब म्हणजे पांढरपेशा समाजाकडून मिळणारी नेहमीचीच हीन व तुच्छ वागणूक मोडकळीस काढून हम भी कुछ कम नहीं हे रितेश मेंगाळ आणि गीता मधे यांनी दाखवून दिले. मूळातच वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सांगली येथील कॉलेजमध्ये मेरीट लिस्ट नुसार प्रवेश प्रक्रिया पार पडते विशेष म्हणजे गुणवत्ता असेल तर आणि तरच प्रवेश मिळतो 12वी & डिप्लोमा नंतर पुनः पुनः नीट & अनेक तत्सम परीक्षा दिल्यानंतर सुध्दा मेरीट मध्ये असाल तरच प्रवेश प्रक्रिया पुर्ण होतें या सर्व बाबींना सामोरे जाऊन कुं. रितेश आणि कुमारी गीता या दोघांनी वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सांगली कॉलेजमध्ये प्रवेश मिळवला आणि शिक्षण घेत असताना भरपुर मेहनत अभ्यास टीटोरियल प्रॅक्टिकल प्रोजेक्ट स्पर्धा परीक्षा इंटर्नल एक्झाम वेळच्या वेळी संपुर्ण सबमिशन पूर्ण केल्यानंतर फायनल एक्झाम देऊन प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होण्यासाठी खुप खुप प्रयत्न करावे लागतात तेव्हा यश पदरात पडते हे निश्चित हिचं गोष्ट आपल्या आदिवासी अनुसूचित जमाती तील ठाकर समाजातील सर्व स्तरातील विद्यार्थि आणि विद्यार्थिनींनी ध्यानात घेतली पाहिजे. कुमार रितेश शंकर मेंगाळ हे आपल्या आपल्या ठाकर समाजातील ज्येष्ठ समाजसेवक कार्यकर्ता तथा उप अभियंता सुधाकर विठ्ठल मेंगाळ MSEDCL कन्नड ग्रामीण म्हणून सर्व परिचित आहेत त्यांचे कनिष्ठ बंधु अहिल्या नगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील गर्दनी गावातील रत्नाई & मांगभाल डोंगराच्या कुशीत व पायथ्याशी वसलेल्या चाफे वाडीतील अतीशय दूर्गम डोंगराळ प्रदेशात दऱ्या खोऱ्यातील आदि.ठाकर वाडीतील श्री शंकर विठ्ठल मेंगाळ & सौ.जयश्री शंकर मेंगाळ गर्दनी (चाफेवाडी) अगस्ति सह साखर कारखाना अकोले येथे कार्यरत असुन त्यांची परिस्थिती जेमतेम आणि बिगर शेती & अत्यंत गरीबीची आहे आजही त्यांचे गर्दनी (चाफेवाडी) येथील घर साधे पाया दगड माती आणि मातीच्या (भेंड्या/ विटा) कौलारू छप्परावर उभारलेले तसेच अनेक सोयी सुविधा व नागरी सेवा पासुन वंचित आहे. अशा यां बिकट परिस्थिती तून अपार कष्ट मेहनत अभ्यास जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर ४०० विद्यार्थ्या मधे पहील्या २५ मधे नंबर पटकावून रितेश याने पुढील वाटचालीसाठी व प्रशिक्षणासाठी भारत फोर्स यां नामांकित आंतरराष्ट्रीय कंपनीत निवड झाली आहे. त्याचं प्रमाणे कुमारी गीता बुधा मधे ही सुध्दा नाशिक जिल्ह्यातील नांदगांव तालुक्यातील जळगाव बु. येथील आदिवासी ठाकरवाडी (बेलेश्वर वाडीतील) असुन घरची परिस्थिती बेताचीच असुन कौटुंबिक पार्श्वभूमी अल्पभूधारक असुन घरची परिस्थिती जेमतेम व हलाखीची असुन शेती आणि मोल मजूरी/ शेत मजुरी तसेच ऊस तोडणी कामगार म्हणुन सात/आठ महिने बाहेर गावी जावे लागते त्यामुळे या दोनही विद्यार्थ्यांचे मनापासून हार्दिक अभिनंदन कितीही कौतुक & प्रशंशा केली तरी कमीच पडेल महाराष्ट्र राज्यातील अनेक अनेक आदिवासी संघटना कडुन रितेश आणि गीता यांच्या यशा बद्दल सर्वत्र कौतुक & अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.1) सह्याद्री आदि. ठाकर ठाकूर समाज उन्नती मंडळ महाराष्ट्र राज्यातील संभाजी नगर (औरंगाबाद)/अहिल्या नगर (अहमदनगर) /ठाणे/पुणे/रायगड/नाशिक/ पालघर/जळगावं अशा आठ जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील आदि. ठाकर ठाकूर समाज यांच्या वतीने यां गुणी विद्यार्थ्यांचे मनापासून हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे.2) आदिवासी विकास परिषद महाराष्ट्र राज्य 3) राया ठाकर फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य,4) आद्य क्रांतिकारक राया ठाकर म. राज्य 5) सह्याद्री आदि. ठाकूर ठाकर नोकरदार उत्कर्ष संस्था महाराष्ट्र राज्य,6) आदिवासी ठाकर समाज संघटना म. राज्य.7) राघोजी भांगरे आदिवासी संघटना म. राज्य.8) आदिवासी कृती समिती म. राज्य.9) आदिवासी ठाकर समाज दुर्बल घटक विकास संस्था कलंकी (संभाजी नगर)10) गौतळा आदि. ठाकर समाज ब हुं उद्देशीय विकास संस्था कनकावतीनगर, कन्नड 11) ऑल इंडिया ट्रायबल फोरम म. राज्य. इत्यादी विविध अनेक आदिवासी संघटना कडुन आदिवासी समाजातील उत्तीर्ण झालेल्यासर्व विद्यार्थ्यांना मनापासून हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.या पदवीदान समारंभात महाराष्ट्र राज्यातील तसेच देशातील प्रत्येक यशस्वी विद्यार्थ्यांचे पालक ईष्ट मित्र मैत्रीणी नातेवाईक भाऊबंद सगेसोयरे पाहूणे आणि हित चिंतक हजारोंच्या संख्येनं उपस्थित होते यावेळी संभाजीनगर येथून श्री. सुधाकर मेंगाळ, सौ.अल्का सुधाकर मेंगाळ, रोहीत मेंगाळ, अश्विनी मेंगाळ, रुद्रांश रोहित मेंगाळ, रोहिणी मेंगाळ, रोषना मेंगाळ, अहिल्या नगर जिल्ह्यातील वडील:श्री शंकर विठ्ठल मेंगाळ, आई:सौ. जयश्री मेंगाळ काका शिवराम वारे सिन्नर सौ. छाया वारे, आदित्य वारे, आजी पार्वताबाई रामभाऊ जाधव, मामा अमोल रामभाऊ जाधव, संगमनेर ,मामी अनिता अमोल जाधव कु .ईश्वरी अमोल जाधव, बाबु अमोल जाधव & दादू अमोल जाधव, मामा माधव गोविन्द दुधवडे, जुन्नर आत्या सुलोचना भारत मधे सिन्नर, सुनंदा शांताराम निरगुडे शिवडे/सिन्नर श्री उघडे सर व सौ. शारदा उघडे पांजरे ह. मू. तासगावं/अकोले, श्री डॉ. सुनिल बारकु केदार पारुंडे/जुन्नर ह.मू. आटपाडी आणि सौ. केदार ताई बुधा मधे बेलेश्वर वाडी नांदगांव आणि असंख्य नाते वाईकांनी वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सांगली येथे येऊन प्रत्येक्षरीत्या पदवीदान समारंभात उपस्थित उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मनापासून हार्दिक शुभेच्छा दिल्या.चाफेवाफी—गर्दनीच्या मातीतून भारत फोर्जपर्यंतचा प्रेरणादायी प्रवास : आदिवासी कुटुंबातील रितेश मेंगाळ यांची पहिल्याच प्रयत्नात नामांकित कंपनीत निवडअहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील चाफेवाफी—गर्दनी या दुर्गम ग्रामीण भागातील एका सर्वसामान्य आदिवासी कुटुंबातील युवकाने जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमांच्या जोरावर यशाचे असे शिखर गाठले आहे की त्याचा प्रवास आज अनेक ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. कु. रितेश शंकर मेंगाळ या युवकाची देशातील आणि जगभरात लौकिक असलेल्या भारत फोर्ज या नामांकित कंपनीमध्ये पहिल्याच प्रयत्नात निवड झाली असून बारामती येथे त्यांची नियुक्ती झाली आहे. अत्यंत साध्या परिस्थितीत वाढलेल्या रितेशच्या या यशाने केवळ त्यांच्या कुटुंबालाच नव्हे तर संपूर्ण गर्दनी, चाफेवाफी परिसर आणि अकोले तालुक्यालाही अभिमानाची भावना दिली आहे.रितेश यांचा शैक्षणिक प्रवास पाहिला तर तो कोणत्याही यशोगाथेपेक्षा कमी नाही. दहावीच्या परीक्षेत त्यांना केवळ 58 टक्के गुण मिळाले होते. अनेक जण अशा टप्प्यावर स्वतःच्या क्षमतेबद्दल शंका घेऊ लागतात; मात्र रितेश यांनी अपयश किंवा कमी गुण यांना कधीच आपल्या भविष्याचा निर्णय घेऊ दिला नाही. त्यांनी अमृतवाहिनी तंत्रनिकेतनमध्ये मेकॅनिकल डिप्लोमासाठी प्रवेश घेतला आणि तेथे स्वतःला पूर्णपणे अभ्यासात झोकून दिले. दिवस-रात्र मेहनत, सातत्यपूर्ण अभ्यास आणि स्वतःवरचा विश्वास यांच्या जोरावर त्यांनी डिप्लोमाच्या अंतिम वर्षात तब्बल 80 टक्के गुण मिळवत आपल्या क्षमतेची ठोस झलक दाखवून दिली.डिप्लोमामधील या उल्लेखनीय यशामुळे त्यांना महाराष्ट्रातील नामांकित आणि गुणवत्तापूर्ण अभियांत्रिकी महाविद्यालयांपैकी एक असलेल्या वालचंद कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, सांगली येथे मेकॅनिकल इंजिनीअरिंगसाठी प्रवेश मिळाला. एका छोट्याशा गावातून आलेल्या आणि मर्यादित साधनसामग्रीत वाढलेल्या विद्यार्थ्यासाठी सांगलीसारख्या शहरात जाऊन शिक्षण घेणे हे स्वतःमध्येच मोठे आव्हान होते. सुरुवातीच्या काळात घरापासून दूर राहणे, नवीन वातावरणाशी जुळवून घेणे, स्पर्धात्मक शिक्षणपद्धती, आर्थिक आणि मानसिक आव्हाने यांचा सामना करताना अनेकदा मन खचले; परंतु रितेश यांनी परिस्थितीसमोर कधीही हार मानली नाही. एका वर्षात त्यांनी स्वतःला त्या वातावरणात सक्षमपणे उभे केले. गावाच्या चौकटीबाहेरचे विशाल जग त्यांनी जवळून पाहिले आणि त्यांना जाणवले की स्वप्ने मोठी असतील तर संघर्षही मोठा असतो. याच जाणिवेने त्यांनी स्वतःला अधिक घडवण्याचा निर्धार केला.महाविद्यालयीन जीवनात त्यांनी केवळ अभ्यासावरच भर दिला नाही, तर उद्योगक्षेत्रातील बदल, आधुनिक तंत्रज्ञान, उत्पादन क्षेत्रातील संधी आणि रोजगार बाजारातील स्पर्धा यांचाही अभ्यास केला. याच काळात त्यांनी स्वतःच्या कौशल्यांचा सातत्याने विकास केला. अनेक विद्यार्थ्यांप्रमाणे नोकरीची वाट पाहण्याऐवजी त्यांनी स्वतःला उद्योगक्षेत्रासाठी सक्षम बनवण्यावर भर दिला. अखेर अंतिम वर्षात त्यांच्या मेहनतीला सुवर्णफळ मिळाले आणि भारत फोर्जसारख्या जागतिक दर्जाच्या कंपनीत काम करण्याची संधी त्यांच्या दारात चालत आली.रितेश यांची निवड ज्या भारत फोर्ज कंपनीत झाली आहे, ती केवळ भारतातीलच नव्हे तर जगातील अग्रगण्य फोर्जिंग कंपन्यांपैकी एक मानली जाते. संरक्षण क्षेत्र, भारतीय सैन्यदल, नौदल, एरोस्पेस, ऑटोमोबाईल, ऊर्जा आणि विविध अभियांत्रिकी क्षेत्रांसाठी अत्याधुनिक उत्पादने निर्माण करणाऱ्या या कंपनीत निवड होणे हे कोणत्याही अभियंत्यासाठी अभिमानाची बाब मानली जाते. विशेष म्हणजे, ही संधी रितेश यांनी पहिल्याच प्रयत्नात मिळवली आहे, ज्यामुळे त्यांच्या गुणवत्तेची आणि मेहनतीची प्रचिती येते.या यशामागे त्यांच्या कुटुंबाचा मोलाचा वाटा आहे. त्यांचे वडील श्री. शंकर विठ्ठल मेंगाळ हे अगस्ती सहकारी साखर कारखान्यात कार्यरत असून त्यांनी अत्यंत कष्टाने आपल्या मुलाचे शिक्षण पूर्ण केले. आर्थिक मर्यादा असतानाही मुलाच्या शिक्षणात कोणतीही तडजोड होऊ दिली नाही. आई सौ. जयश्री शंकर मेंगाळ या गर्दनी गावात सेविका म्हणून कार्यरत आहेत. मुलाच्या शिक्षणासाठी त्यांनी केलेला त्याग, दिलेले संस्कार आणि दाखवलेला विश्वास हेच रितेश यांच्या यशाचे खरे भांडवल ठरले. मुलगा मोठा अभियंता व्हावा, त्याने आयुष्यात काहीतरी वेगळे करावे, ही त्यांची इच्छा आज प्रत्यक्षात उतरली आहे.रितेश यांच्या यशामागे त्यांच्या कुटुंबातील ज्येष्ठांचे मार्गदर्शनही तितकेच महत्त्वाचे ठरले. त्यांचे बाबा (काका) सुधाकर विठ्ठल मेंगाळ, सिव्हिल इंजीनीअर म्हणून कार्यरत राहिलेले आणि महावितरणमध्ये अभियंता म्हणून सेवा बजावलेले अनुभवी व्यक्तिमत्त्व यांनी वेळोवेळी दिलेले मार्गदर्शन, करिअरविषयक सल्ले आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील सखोल ज्ञान यामुळे रितेश यांना योग्य दिशा मिळाली. शिक्षणापासून करिअरपर्यंतच्या अनेक टप्प्यांवर त्यांनी दिलेला आधार आणि प्रेरणा ही रितेश यांच्या यशाची महत्त्वाची बाजू ठरली.आज रितेश यांची कथा ही फक्त एका विद्यार्थ्याच्या नोकरी मिळाल्याची बातमी नाही; तर ती ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थ्याला, प्रत्येक पालकाला आणि प्रत्येक संघर्ष करणाऱ्या युवकाला नवी उमेद देणारी यशोगाथा आहे. दहावीत फक्त 58 टक्के गुण मिळाले म्हणून आयुष्य संपत नाही, आर्थिक परिस्थिती कमकुवत आहे म्हणून स्वप्ने पाहू नयेत असे नाही, गाव लहान आहे म्हणून ध्येयही लहान असावे असे नाही—हे रितेश यांनी आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखवले आहे.चाफेवाफी—गर्दनीच्या मातीतून निघालेला हा युवक आज हजारो विद्यार्थ्यांसाठी प्रेरणेचा दीप बनला आहे. जिद्द, कष्ट, आई-वडिलांचे संस्कार, ज्येष्ठांचे मार्गदर्शन आणि स्वतःवरचा अढळ विश्वास यांच्या जोरावर कोणतीही उंची गाठता येते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे कु. रितेश शंकर मेंगाळ. त्यांच्या या यशामुळे केवळ त्यांच्या कुटुंबाचे नव्हे तर संपूर्ण अकोले तालुक्याचे नाव उज्ज्वल झाले असून भविष्यात ते आणखी मोठी भरारी घेतील, अशी अपेक्षा सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे. त्यांच्या या प्रवासाने अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू आणले असून संघर्षातून उभ्या राहणाऱ्या प्रत्येक स्वप्नाला नवी दिशा दिली आहे. "परिस्थिती नव्हे, तर जिद्द माणसाला मोठे बनवते," हे वाक्य आज रितेश मेंगाळ यांच्या यशामुळे अक्षरशः खरे ठरले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १२ जून २०२६


# बालपणाला मुक्त श्वास देऊया- डॉ. राजेंद्र बगाटे



दि. १२ जून हा दिवस जगभरात 'बालमजुरीविरोधी जागतिक दिन' म्हणून साजरा केला जातो. बालपण हे प्रत्येक मुलाच्या आयुष्यातील सर्वात निरागस, आनंददायी आणि घडणारा काळ असतो. या काळात मुलांच्या हातात पुस्तके, खेळणी आणि स्वप्नांची रंगीत दुनिया असायला हवी; परंतु वास्तव मात्र यापेक्षा खूप वेगळे आहे. जगातील कोट्यवधी मुले आजही गरिबी, सामाजिक विषमता, अशिक्षितपणा आणि विविध प्रतिकूल परिस्थितींमुळे शिक्षणापासून वंचित राहून मजुरी करण्यास भाग पडत आहेत. त्यांच्या कोवळ्या हातात पेनऐवजी विटा, कचऱ्याच्या पिशव्या, चहाचे ग्लास किंवा कारखान्यातील धोकादायक साधने दिली जात आहेत. ही परिस्थिती केवळ त्या मुलांच्या भविष्यावरच परिणाम करणारी नाही, तर संपूर्ण समाजाच्या विकासालाही अडथळा निर्माण करणारी आहे. म्हणूनच बालमजुरीविरोधी जागतिक दिनाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.बालमजुरी ही केवळ आर्थिक समस्या नसून ती सामाजिक, नैतिक, शैक्षणिक आणि मानवी हक्कांशी संबंधित गंभीर समस्या आहे. जेव्हा एखाद्या मुलाला त्याच्या वयानुसार शिक्षण, खेळ, आरोग्य आणि सुरक्षित वातावरणापासून वंचित ठेवून उपजीविकेसाठी काम करण्यास भाग पाडले जाते, तेव्हा ती बालमजुरी ठरते. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या व्याख्येनुसार अशी कोणतीही कामे जी मुलांच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक किंवा नैतिक विकासासाठी घातक ठरतात आणि त्यांच्या शिक्षणात अडथळा निर्माण करतात, ती बालमजुरी मानली जातात. बालमजुरीमुळे मुलांचे बालपण हिरावले जाते, त्यांचे शिक्षण अर्धवट राहते आणि त्यांचे आयुष्य गरिबीच्या दुष्टचक्रात अडकून पडते.बालमजुरीचा इतिहास मानवजातीच्या औद्योगिक विकासाशी निगडित आहे. औद्योगिक क्रांतीच्या काळात कारखान्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर बालकामगारांचा वापर केला जात असे. कमी वेतनात, जास्त वेळ आणि कोणतीही सुरक्षा नसताना मुलांकडून काम करून घेतले जात असे. कालांतराने समाजसुधारक, मानवाधिकार संघटना आणि विविध देशांच्या सरकारांनी बालमजुरीविरोधात आवाज उठवला. कामाच्या ठिकाणी मुलांचे होणारे शोषण रोखण्यासाठी विविध कायदे करण्यात आले. या चळवळीचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे २००२ साली आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने १२ जून हा दिवस 'बालमजुरीविरोधी जागतिक दिन' म्हणून घोषित केला. या दिवसाचे उद्दिष्ट बालमजुरीविषयी जनजागृती करणे, बालकामगारांच्या समस्यांकडे जगाचे लक्ष वेधणे आणि बालमजुरी निर्मूलनासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यास प्रोत्साहन देणे हे आहे.जगभरातील बालमजुरीचे स्वरूप विविध प्रकारचे आहे. काही मुले शेतीच्या कामात गुंतलेली असतात, तर काही कारखाने, हॉटेल्स, चहाच्या टपऱ्या, बांधकाम क्षेत्र, खाणी, घरगुती कामे, कचरा वेचणे किंवा रस्त्यावरील विक्री यांसारख्या क्षेत्रांत काम करतात. काही ठिकाणी मुलांना सक्तीची मजुरी करावी लागते, तर काही मुलांना मानवी तस्करीद्वारे कामासाठी विकले जाते. विशेषतः धोकादायक उद्योगांमध्ये काम करणाऱ्या मुलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. रसायनांचा संपर्क, धूळ, आवाज, अवजड यंत्रसामग्री आणि अपुरी सुरक्षा यामुळे त्यांना विविध आजारांना सामोरे जावे लागते. अनेकदा अपघातांमुळे त्यांचे कायमस्वरूपी अपंगत्वही येते.बालमजुरीची कारणे अनेकांगी आहेत. गरिबी हे त्यामधील प्रमुख कारण मानले जाते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांमध्ये मुलांच्या कमाईला कुटुंबाच्या उत्पन्नाचा एक भाग म्हणून पाहिले जाते. शिक्षणाचा खर्च, बेरोजगारी, कर्जबाजारीपणा आणि अपुरी सामाजिक सुरक्षा यामुळे पालक मुलांना कामावर पाठवतात. अशिक्षित पालकांना शिक्षणाचे महत्त्व समजत नाही आणि तात्पुरत्या आर्थिक गरजांपुढे मुलांच्या भवितव्याकडे दुर्लक्ष होते. काही भागांत सामाजिक रूढी, लिंगभेद आणि पारंपरिक व्यवसायांची सक्ती यांमुळेही बालमजुरी वाढीस लागते. मुलींना घरगुती कामे किंवा घरकामासाठी इतरांकडे पाठविण्याच्या घटनाही मोठ्या प्रमाणात आढळून येतात.शिक्षणाचा अभाव आणि बालमजुरी यांचे घनिष्ठ नाते आहे. जी मुले शाळेबाहेर राहतात, त्यांना बालमजुरीच्या विळख्यात अडकण्याची शक्यता अधिक असते. दुसरीकडे, जेव्हा मुले काम करू लागतात, तेव्हा त्यांचे शिक्षण खंडित होते. अशा प्रकारे गरिबी, अशिक्षण आणि बालमजुरी यांचे दुष्टचक्र तयार होते. या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी सर्वसमावेशक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण अत्यंत आवश्यक आहे. शाळांमध्ये आकर्षक वातावरण, मोफत शैक्षणिक सुविधा, पौष्टिक आहार योजना आणि पालकांमध्ये जागृती निर्माण केल्यास बालमजुरीचे प्रमाण कमी होऊ शकते.भारतात बालमजुरी ही चिंतेची बाब राहिली आहे. देशाने आर्थिक प्रगती केली असली, तरी अनेक सामाजिक आणि आर्थिक विषमतांमुळे बालमजुरी पूर्णतः नष्ट झालेली नाही. ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांमध्ये बालकामगार आढळून येतात. काही मुले शेतीत काम करतात, तर काही लहान उद्योग, हॉटेल्स, वर्कशॉप्स, विटभट्ट्या आणि घरगुती उद्योगांमध्ये गुंतलेली असतात. शहरांमध्ये स्थलांतरित कुटुंबांतील मुलांवर बालमजुरीचे संकट अधिक तीव्रतेने दिसून येते. कोविड-१९ महामारीनंतर अनेक कुटुंबांच्या आर्थिक स्थितीवर विपरीत परिणाम झाल्याने काही भागांत बालमजुरीचे प्रमाण वाढल्याची भीती व्यक्त करण्यात आली होती.भारतीय राज्यघटनेने बालकांच्या संरक्षणासाठी विविध तरतुदी केल्या आहेत. राज्यघटनेच्या कलम २४ नुसार चौदा वर्षांखालील मुलांना कारखाने, खाणी किंवा इतर धोकादायक उद्योगांमध्ये कामावर ठेवण्यास बंदी घालण्यात आली आहे. कलम २१-अ नुसार सहा ते चौदा वर्षे वयोगटातील मुलांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार देण्यात आला आहे. राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांमधील कलम ३९ मध्ये मुलांच्या आरोग्याचे आणि विकासाचे संरक्षण करण्यावर भर देण्यात आला आहे. या घटनात्मक तरतुदी बालहक्कांच्या संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण ठरतात.भारतात बालमजुरी प्रतिबंधासाठी विविध कायदे अस्तित्वात आहेत. बालमजुरी (प्रतिबंध आणि नियमन) अधिनियम १९८६ आणि त्यामधील २०१६ मधील सुधारणा महत्त्वपूर्ण आहेत. या कायद्यानुसार चौदा वर्षांखालील मुलांना कोणत्याही व्यवसायात रोजगार देण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच चौदा ते अठरा वर्षे वयोगटातील किशोरांना धोकादायक उद्योगांमध्ये काम करण्यास मनाई करण्यात आली आहे. शिक्षणाचा हक्क कायदा, किशोर न्याय कायदा आणि मानवी तस्करीविरोधी तरतुदी देखील बालमजुरीविरोधातील लढ्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. तथापि, केवळ कायदे पुरेसे नसून त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.बालमजुरीचा मुलांच्या शारीरिक आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. वाढत्या वयात अति श्रम केल्यामुळे त्यांच्या शरीराची योग्य वाढ होत नाही. कुपोषण, अशक्तपणा, श्वसनविकार, त्वचारोग आणि दृष्टीदोष यांसारख्या समस्या उद्भवतात. धोकादायक उद्योगांमध्ये काम करणाऱ्या मुलांना रसायनांच्या संपर्कामुळे दीर्घकालीन आजार होऊ शकतात. अपुऱ्या विश्रांतीमुळे आणि अस्वच्छ वातावरणामुळे त्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते.बालमजुरीचे मानसिक परिणामही तितकेच गंभीर असतात. बालपणात सतत कामाचा ताण, मारहाण, अपमान आणि शोषण यांचा सामना करणाऱ्या मुलांमध्ये नैराश्य, भीती, आत्मविश्वासाचा अभाव आणि सामाजिक अलिप्तता निर्माण होऊ शकते. काही मुलांना भावनिक आधार मिळत नसल्याने त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास खुंटतो. बालमजुरीमुळे त्यांच्यातील सर्जनशीलता, जिज्ञासा आणि स्वप्न पाहण्याची क्षमता कमी होत जाते.बालमजुरी ही मुलांच्या मूलभूत मानवी हक्कांचे उल्लंघन आहे. प्रत्येक मुलाला शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता, संरक्षण आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. बालहक्कांसंदर्भातील संयुक्त राष्ट्रसंघाच्या करारामध्ये मुलांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात आला आहे. बालमजुरी या हक्कांना बाधा आणते आणि मुलांना त्यांच्या क्षमतांचा पूर्ण विकास करण्यापासून रोखते. त्यामुळे बालमजुरीविरोधातील लढा हा मानवी प्रतिष्ठेच्या संरक्षणासाठी आवश्यक आहे.बालमजुरी निर्मूलनासाठी सरकार, स्वयंसेवी संस्था, उद्योगक्षेत्र, शैक्षणिक संस्था आणि सामान्य नागरिक यांचे संयुक्त प्रयत्न आवश्यक आहेत. सरकारने गरिबी निर्मूलनाच्या योजना प्रभावीपणे राबविणे, गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे आणि कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. स्वयंसेवी संस्था बालकामगारांची ओळख पटविणे, त्यांचे पुनर्वसन करणे आणि समाजामध्ये जागृती निर्माण करणे यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. उद्योगक्षेत्राने पुरवठा साखळीमध्ये बालकामगारांचा वापर होणार नाही याची खात्री करणे आवश्यक आहे.पालकांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य देणे, अल्पकालीन आर्थिक फायद्यापेक्षा त्यांच्या उज्ज्वल भविष्याचा विचार करणे आणि मुलांवरील कामाचा बोजा कमी करणे आवश्यक आहे. समाजानेही बालकामगारांकडे केवळ सहानुभूतीने न पाहता त्यांच्या समस्येच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न करायला हवा. घरगुती मदतनीस म्हणून किंवा लहान उद्योगांमध्ये बालकामगारांचा वापर टाळणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.माध्यमांची भूमिकाही महत्त्वपूर्ण ठरते. वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ आणि सामाजिक माध्यमांच्या साहाय्याने बालमजुरीच्या समस्येकडे समाजाचे लक्ष वेधले जाऊ शकते. बालकामगारांच्या वास्तवाचे चित्रण करून जनजागृती केली जाऊ शकते. तसेच यशस्वी पुनर्वसनाच्या कथा समाजासमोर आणल्यास सकारात्मक बदल घडवून आणण्यास मदत होऊ शकते.शिक्षण हा बालमजुरीविरोधातील सर्वात प्रभावी उपाय मानला जातो. प्रत्येक मुलाला दर्जेदार, सर्वसमावेशक आणि आनंददायी शिक्षण मिळाल्यास बालमजुरीचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटू शकते. शाळा सोडलेल्या मुलांना पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष उपक्रम राबविणे आवश्यक आहे. कौशल्य विकास, समुपदेशन आणि आर्थिक सहाय्याच्या माध्यमातून बालकामगारांचे पुनर्वसन केले जाऊ शकते.बालमजुरीविरोधी जागतिक दिन आपल्याला केवळ समस्या दाखवून देत नाही, तर उपाययोजनांची दिशाही दाखवतो. या दिवसानिमित्त आयोजित केले जाणारे जनजागृती कार्यक्रम, चर्चासत्रे, शालेय उपक्रम आणि मोहिमा समाजामध्ये सकारात्मक बदल घडविण्यास मदत करतात. मुलांचे बालपण सुरक्षित ठेवण्यासाठी सामूहिक बांधिलकी निर्माण करणे हे या दिवसाचे खरे उद्दिष्ट आहे.आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात मानवाने अभूतपूर्व प्रगती केली आहे; परंतु जर समाजातील एकही मूल शिक्षणापासून वंचित राहून मजुरी करण्यास भाग पडत असेल, तर आपल्या विकासाच्या संकल्पना अपूर्ण ठरतात. मुलांच्या हातात कामाची साधने नव्हे तर ज्ञानाची साधने असली पाहिजेत. त्यांना भयमुक्त, शोषणमुक्त आणि आनंदी बालपण मिळणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.बालमजुरी निर्मूलन हा केवळ सरकारचा कार्यक्रम नसून तो सामाजिक चळवळ बनला पाहिजे. प्रत्येकाने आपल्या स्तरावर जागरूक राहून बालमजुरीच्या घटनांची माहिती संबंधित यंत्रणांना द्यावी. बालकामगारांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सहकार्य करावे. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन बालपणाचे संरक्षण करण्यासाठी पुढाकार घेतल्यासच बालमजुरीमुक्त समाजाची निर्मिती शक्य होईल.दि. १२ जूनचा हा दिवस आपल्याला एक महत्त्वपूर्ण संदेश देतो की मुलांचे स्थान शाळेत आहे, कामाच्या ठिकाणी नाही. त्यांच्या चेहऱ्यावरचे हसू, डोळ्यांतील स्वप्ने आणि भविष्याबद्दलची आशा जपणे हीच खरी मानवता आहे. प्रत्येक मूल हे राष्ट्राची अमूल्य संपत्ती आहे. त्यांना सुरक्षित, सन्मानपूर्वक आणि संधींनी समृद्ध जीवन देणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. बालमजुरीविरोधातील संघर्ष हा मुलांच्या अधिकारांसाठी, सामाजिक न्यायासाठी आणि अधिक संवेदनशील जगाच्या निर्मितीसाठीचा संघर्ष आहे. चला, या जागतिक दिनानिमित्त आपण सर्वजण अशी प्रतिज्ञा करूया की कोणत्याही मुलाचे बालपण मजुरीच्या ओझ्याखाली दबले जाणार नाही. प्रत्येक मुलाला शिक्षण, संरक्षण, प्रेम आणि स्वप्न पाहण्याचे स्वातंत्र्य मिळेल. कारण बालपण वाचविणे म्हणजेच भविष्य वाचविणे होय.




**डॉ. राजेंद्र बगाटे,**

**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत),**

**bagate.rajendra5@gmail.com**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १२ जून २०२६


# जिंतूर - सेलू तालुक्यासह परभणी जिल्ह्यातील भार नियमन तात्काळ बंद करून भ्रष्टाचाराची चौकशी करा - मा.आ.विजय भांबळे

**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** सेलू तालुक्यासह परभणी जिल्ह्यातील भार नियमन तात्काळ बंद करा व जिंतूर सेलू तालुक्यात झालेल्या दुरुस्तीच्या कामाची सखोल चौकशी करून लाखो रुपयाचा भ्रष्टाचार केलेल्या कंपनी विरोधात कडक कार्यवाही करण्यासाठी मा.आ.विजयराव भांबळे व शिष्ट मंडळ यांनी अधीक्षक अभियंता परभणी यांना लेखी निवेदनाद्वारे मागणी केली. जिंतूर- सेलू तालुक्यासह परभणी जिल्ह्यात सकाळी 6 ते 9 व सायंकाळी 6 ते रात्री 10 पर्यंत महावितरण कडून भारनियमन सुरु आहे. राज्यात अतिउष्ण उन्हाळा सुरु असून जिंतूर-सेलू तालुक्यासह परभणी जिल्ह्याचे तापमान 40 ते 43 अंश सेल्शिअंश एवढे वाढलेले असताना देखील भारनियमनच्या नावाखाली वीज बंद करून शेतकरी, विद्यार्थी वयोवृध्द, महिला, बालक व सामान्य नागरिकास वेठीस धरल्या जात आहे . महाराष्ट्र शासनाने संपूर्ण महाराष्ट्र भारनियमन मुक्त घोषणा केली असून देखील जिंतूर-सेलू तालुक्यासह परभणी जिल्ह्यात सक्तीचे भारनियमन सुरु आहे. यामुळे संपूर्ण ग्रामीण व शहरी जिवन विस्कळीत झाले आहे. अनके ठिकाणी 50 amp पेक्षा कमी वीज भार असताना देखील अनेक उपकेंद्रावर भारनियमनच्या नावाखाली वीज बंद केल्या जाते. अनेक भागात सिंगल फेज लाईट व्यवस्था असताना देखील कृषी पंपाचा भार उपकेंद्रावर 130 amp पेक्षा जास्त झाल्यास केवळ कृषीची वीज बंद न करता त्यासोबत गावठाणची देखील वीज बंद केल्या जात आहे. त्यासाठी जिंतूर - सेलू तालुक्यासह परभणी जिल्ह्यातील विजेचे भारनियम तात्काळ बंद करण्यात यावे.महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (MSEDC Ltd.) महावितरण परिमंडळ कार्यालया अंतर्गत परभणी जिल्ह्यात RDSS T-२७, गावठाण फिडर सेपरेशन या झालेल्या कामात अती निकृष्ट दर्जाची कामे करून 1000 रु कोटीचा प्रचंड भ्रष्टाचार संबंधीत ठेकेदार 1) JACK SON 2) POLY CAB 3) ASHOKA BIDCON व संबंधीत कार्यालयीन अधिकारी यांच्या संगनमताने केलेल्या भ्रष्टाचाराची व निकृष्ट कामाची सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करून फौजदारी गुन्हे दाखल करून संबंधी एजन्सीला व उप एजन्सीला काळ्या यादीत टाकून तात्काळ बिले अदा न करता सखोल चौकशी करणेमहाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (MSEDC Ltd.) महावितरण परिमंडळ अंतर्गत कामाची चौकशी, तपासणी केली असता अती निकृष्ट दर्जाची कामे बोगस व प्रचंड मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार संबंधीत कार्यालयीन अधिकारी व परभणी विभागातील कांही अधिकारी व संबंधीत ठेकेदार एजन्सी मे 1) JACK SON 2) POLY CAB 3) ASHOKA BIDCON व उप एजन्सी यांनी संगनमत करून प्रचंड भ्रष्टाचार, बोगसगिरी केलेल्या कामाचे भ्रष्टाचार केला आहे. सदर कामास वापरण्यात आलेले लोखंडी पोल हे कमी वजनाचे व कमी उंचीचे वापरले आहेत. तसेच सदरील कामात वापरण्यात आलेले कंडक्टर कमी साईजचे आहेत. तो इस्टीमेट प्रमाणे 1.20 sq जाडा गेज असणे गरजेचे असताना तो 95 sq किंवा कुठे कुठे तर 70 sq गेज वापरण्यात आला आहे.अनेक ठिकाणी जास्तीचे पोल दाखवून बोगस बिले उचलेले आहेत. सदरील फिडर वरील ९ मिटर पोल ५ फुट व ११ मिटर पोल ६ फुट खोली संपूर्ण नियमानुसार सिमेंट काँक्रीटींग आढळून आलेले नाही. वरील १ फुट असलेला गट्टू (मफिंग) ही सुध्दा १ फुट x १.५ फुट रूंदी व लांबी नियमबाह्य आढळली असता कच (Dust) चा वापर रेती बगळता केलेला आहे. सदरील फिडरवरील मंजूर झालेले गाव व खेडे व वस्तीसाठी गावठाण फिडर वरील २४ तास विद्युत सेवा ही गावे वगळून व कांही गावातील संपूर्ण गावठाणचे विद्युत रोहित्र (Transformer) कमी बसवून त्या गावाला वंचित ठेवले आहे. सदरील कांही फिडरवरील विद्युत रोहित्र नियमबाह्य शेतीचे व आकडे टाकूण शेती सहाय्य उपकरणे व विद्युत रोहित्र चावलत आहे. सदरील फिडरवरील पोल कांही म्हणजे बरेच NH हायवे रोडच्या लगतच आहे. ते नियमाबाह्य उभे केलेले असून त्यामुळे मोठे अपघात घडु शकतात. सदरील फिडरवरील कांही रोहित्र विद्युतचे EI Call बिल मिळवून सुध्दा आजही सुरू केलेले नाही. त्यामुळे विज चोरी व अपघात घडु शकतात.सदरील फिडवरील पोल (खांब) हा सर्व रोडच्या खूप जवळ उभे केलेले आहे. त्यामुळे अपघात घडत आहे व रोड रूंदी करणासाठी अडचण व अडथळा निर्माण होत आहे. सदरील फिडरवरील बसविलेले विद्युत रोहित्र नवीन हे चांगल्या गुणवत्तेचे नसून खूप गरम होऊन ऑईल गळती होत आहे व सदरील फिडर वरील एकाही विद्युत रोहित्राला एच.टी. (HT) लाईन मिटर विथ सिटी (CT) बसविलेली नाही.सदरील फिडरवरील विद्युत रोहित्र हि मनमानी रोडच्या कडेला, शैक्षणिक क्षेत्रात अशा ठिकाणी बसविले आहेत ते नियमबाह्य असून त्यामुळे अपघात घडत आहेत. सदरील फिडरवरील प्रत्येक पोल व विद्युत रोहित्रावरती काटेरी तार (Barbed Wire) हे नियमानुसार ४० ते ४८ वेढे मारलेले नसून ४.८ कि.ग्रॅ. अंदाजे ४ कि.ग्रॅ. वापरले पाहिजे जेणे करून अपघात घडत नाही. ते तेथे खूप कमी प्रमाणात वापरले आहे. जसे की, १ ते १.५ कि.ग्रॅ. १० ते १५ वेढे (आडे) यामुळे अपघात जनावरे, लाहन मुले, मुली याला धोका होण्याची संभावना आहे. खतरा धोका पाटी (Danger Board) हे आजही पुसट व (Faint) झालेले आहे. निकृष्ट दर्जाचे (Danger Board) व (Barbed Wire) वापरल्यामुळे पोल जवळील विद्युत रोहित्र जवळील अपघात होण्याची जास्त शक्यता असते. सदरील फिडरवरील रोड क्रॉसिंग, स्कूल क्रॉसिंग, घर व दवाखाना असे कांही नियमातील जागेवरती अंतर व Guarding नियमित असतात व त्यामुळे अपघाताची शक्यता कमी होते. परंतू सदरील फिडरवरती याचा वापर केलेला नाही. प्रत्येक पोल हा उभा करतांना त्यामध्ये माती व मुरूम तिथेच निघालेले दगड गोटे यांनी बुजविलेले आहे जो रेशो आहे त्यानुसार रेती, खडी, काँक्रीटींग बिलकुल केलेले नाही. तसेच DTC चे अर्थिंग सुध्दा नियमानुसार न करता पोलच्या खड्ड्यातच व वरून केलेल्या सिमेंट कडामध्येच टोचून दिलेले आहे. बऱ्याच ठिकाणी फक्त अर्थिंग तार या पोललाच बांधून टाकलेला आहे. सदरील अर्थिंगचा खड्डा न करता रेशो न वापरता अर्थिंग पाईप कमी गेजचा वापर व काही ठिकाणी तर पाईपच नाही. त्यामुळे पावसाळ्यात पाईपला जनावरे किंवा मनुष्य प्राणी यांचा स्पर्श झाला तर अपघात झाल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी प्रत्यक्ष हायड्रा मशीनद्वारे किती फुट व काय काय मटेरिअल वापरले आहे तसेच त्याचा रेशो त्याची सखोल चौकशी व्हावी. सदरील फिडरवरील पोल काँक्रीटींग चेक केले असता रेती ऐवजी डस्ट वापरण्यात आली आहे. त्यामुळे पोलला धरून न ठेवता रिंग केलेली सोडून देत आहे व त्याची प्रत्यक्ष राख राखुंडी झाल्याचे दिसून येते. आत्ताच ते पूर्णपणे खराब झालेले गळून पडलेले दिसत आहे. सदरील कामावरील सर्व पोल व अर्थिंग पाईपची सिव्हील काम चेक केले असता ०% क्युरिंग केलेलीच नाही त्यामुळे सिमेंटची राख झालेली आहे, गळून पडत आहे. सदरील कामावरील लूज स्पॅम आढळून आले असता ते टाईट असले पोहिजे जेणे करून लाईट गळती होत नाही व स्पार्किंग व जिवीत हाणी होत नाही. तसे न करता लूज तार असल्याचे आढळून आले आहे. सदरील कामावरील सर्व पोल लोखंडी चेक केले असता जंग रोखण्यासाठी (गंजूनये) यासाठी वापरण्यात आलेले रंग जसे की, रेड ऑक्साईड, सिल्व्हर पेंट, काळा पेंट यांचे थर आढळून आले नाही. त्यामुळे कांही ठिकाणी थातूर-मातूर रंग रंगोटी करून वापरले असून आजच पोलचे रंग गेलेले असून गंज पकडलेला आहे. सदरील कामावरील वापरण्यात आलेले पीन इन्स्युलेटर (चिमन्या) व त्याच प्रमाणात सर्व साहित्य अती निकृष्ट दर्जाचे आढळून आलेले आहे. जसे की, स्टे वायर, कंडक्टर व एस.टी. पोल असे सर्व साहित्य नियमानुसार न वापरता अंदाजपत्रकात नमुद केलेल्या निकषानुसार वापरता V-Cross, Top, RSJ Poles, Nut Bolt हे नियमानुसार वापरलेले नाही. सदरील फिडर वरील चुकीचे व वाढीव बिल दाखवून Quantity of Material व पोल Conductor (५५ Sq.mm) व इतर मटेरिअल हे वाढीव दाखवून शासनाची फसवणूक केलेली आहे. रोड क्रॉसिंग कामामध्ये अंडर ग्राउंड केबल हा अंडर साईजचा केबल वापरला आहे असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यावेळी मा.आ.विजय भांबळे, लक्ष्मणराव बुधवंत तालुका अध्यक्ष रा.कॉ.जिंतूर, केशवराव बुधवंत माजी जिल्हा परिषद अध्यक्ष, विद्यमान जिल्हा परिषद सदस्य कृष्णकांत देशमुख, माणिकराव हरकळ, शंकर जाधव, विद्यमान पंचायत समिती सदस्य प्रशांत नाईक, जिवन आवटे, बाजार समिती संचालक अप्पासाहेब डुख, नंदुमार अंभोरे, अविनाश मस्के, नगरसेवक अशोकराव बंड, जाबेर भाई, करीम लाला, सुधारक रोकडे ता.अ.रा.कॉ.सेलू, खयुम कादरी, चंद्रकांत गाडेकर, शुभम कदम, रामेश्वर गाडेकर, संतोषराव पावडे, ई. कार्यकर्ते उपस्थित होते.

